**मजकुर :—**

दिनांक २०/०६/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **" Best Detection of the Month "** माहे मार्च —२०२३ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ मार्च —२०२३

| ०७ | शिवाजीनगर पोलीस ठाणे परिमंडळ—०६,मुंबई | गु.र.क्र. २४०/२०२३ कलम ३६३ भा.द.वि |
|---|---|---|

—: " **रखवालीतून अपहरण** ":—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—**नमूद गुन्हयांत दिनांक ०३/०३/२०२३ रोजी दुपारी १२:३० वा चे सुमारास फिर्यादी श्री तजमुल शफिक शेख ,वय ३५ वर्ष यांचा मुलगा मुकद्दस, वय २ वर्ष ०२ महीने यास कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन त्याचे कायदेशीर रखवालीतुन अपनयन केले. मुलगा मिळून येत नसल्याने फिर्यादी यांनी राहत्या परिसरात शोध घेतला तरी तो मिळून न आल्याने कोणीतरी अज्ञात इसमाने त्याचे अपहरण केल्याची खात्री पटल्याने पोलीस ठाणेस प्रत्यक्ष येवून त्यांनी तक्रार दिल्याने सविस्तर जबाब नोंद करून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री तजमुल शफिक शेख ,वय ३५ वर्ष |
| बळीत | :— | मुकद्दस तजमुल शेख वय २ वर्ष २ महीने |
| आरोपी अटक व दिनांक | :— | मलिकाराम सत्तान यादव, वय ३३ वर्षे,<br>अटक दिनांक – ०८/०३/२०२३ रोजी |

**तपास कौशल्य :—**सदरचा गुन्हा घडल्यानंतर अपनयन झालेल्या बालकाची माहिती मिळविण्याकरीता पोलीस ठाणे परिसरात गस्तीवरील वाहने तसेच मिसिंग पथक, गुन्हे प्रकटीकरण पथक, गुंडा विरोधी पथक यांना शोध घेण्याच्या सुचना देण्यात आल्या. अपनयन झालेल बालकाबाबत वायरलेस सदेश प्रसारित करुन त्याचा शोध घेण्याबाबत माहिती प्रसारित करण्यात आली. तसेच मुख्य नियंत्रण कक्षास ई—मेल द्वारे संदेश पाठवण्यात आला.

आजुबाजुच्या परिसरातील गोवंडी रेल्वे परिसर, लोकमान्य टिळक टर्मिनस तसेच घटनास्थळ परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले व त्यानंतर त्या ठिकाणी गुन्हे प्रकटीकरण पथक, गुंडा पथक आरपीएफ पोलीस यांचे संयुक्तपणे सर्च ऑपरेशन राबवण्यात आले. गुन्हयाचे घटनास्थळ परिसरातील रहिवाशी तसेच डक होल या ठिकाणी बळीत बालकाचा शोध घेण्यात आला. गुन्हयाचे तपासाच्या अनुषंगाने गुन्हयाचे घटनास्थळ परिसरतील सरकारी तसेच खाजगी सी.सी.टी.व्ही फुटेज तपासण्यात आले.

गुन्हयाचे तांत्रीक तपासात ९० फीट रोड, बैगणवाडी येथील प्राप्त सी सी टी व्ही फुटेज नुसार संशयित इसम हा गुन्हयातील अपनयन करण्यात आलेल्या बालकासह रिक्षात बसुन गेलेला दिसुन आला. सदर रिक्षा बाबत अधिक फुटेज प्राप्त करुन रिक्षाचा MH 03 BT 5782 असा क्रमाक प्राप्त करण्यात आला. नमुद रिक्षा क्र MH 03 BT 5782 चालक श्री. शमशुददीन नबीहसन सय्यद, वय ७० वर्षे यांचे कडे करण्यात आलेल्या तपासा प्रमाणे आरोपी मालिकराम यांनी गुन्हयातील बालकाचे अपनयन करुन त्याचे रिक्षाने चेबुर या ठिकाणी सोडले असल्याची माहिती दिली.

नमुद गुन्हयात गुन्हयाचे घटनास्थळ परिसरात प्राप्त सी.सी.टी.व्ही फुटेज मधील संशयीत इसमाबाबत स्थानिक परिसरात करण्यात आलेल्या तपासात, सी.सी.टी.व्ही फुटेज मधील इसम हा नमुद परिसरात कडीया काम करणारा मालिकराम सत्तन यादव हा असल्याचे स्पष्ट झाले. मालिकराम सत्तन यादव यांचे बाबत प्राप्त माहिती प्रमाणे त्याचा चेबुर येथील राहण्याचा पत्ता व मोबाईल क्रमाक प्राप्त करण्यात आला. पाहिजे आरोपी मालिकराम सत्तन यादव यांचे चेबुर येथील राहते पत्त्यावर जावुन चौकशी करण्यात आली असता, घर मालकाने दिलेल्या माहिती प्रमाणे अपनयन झालेल्या बालक हे मालिकराम सत्तन यादव यांचे घरात पाहिले असल्याची माहिती मिळून आली. यावरुन, गुन्हयातील बळीत बालकाचे मालिकराम सत्तन यादव यांनेच अपहरण केले असलयाबाबतची खात्री पटवण्यात आली.

आरोपी मालिकराम यादव यांचे बाबत त्याचे घरमालकाकडुन प्राप्त आधार कार्ड प्रमाणे त्याचा गावचा मुळ पत्ता प्राप्त करण्यात आला. तसेच घर मालकाने दिलेल्या माहिती प्रमाणे तो त्याचे कुटुबियासोबत गावी जात असल्याची माहिती मिळाली. नमुद माहितीचे आधारे आरोपी मालिकराम यादव यांचे मोबाईल क्रमाकाचे कॉल रेकॉर्ड/लोकेशन प्राप्त करण्यात येवुन, आरोपीताचे गावाकडे जाणारे मार्गावरील रेल्वे ट्रेनचे लोकेशन घेण्यात आले.

आरोपीताचे कॉल रेकॉर्ड प्रमाणे त्याचे सपर्कातील लखनऊ येथील साक्षीदार इमरान यास विश्वासात घेवुन, आरोपीताचे प्रवासाची माहिती प्राप्त करण्यात आली. गुन्हयाचे तपासा प्रमाणे पोउपनि मालवेकर व पथक हे मा वरिष्ठाची परवागी घेवुन, लखनऊ, राज्य उत्तरप्रदेश या ठिकाणी विमानाने रवाना झाले. लखनऊ या ठिकाणी स्थानिक पोलीस ठाणे बाजार खाला पोलीस ठाणे, ऐशबाग रेल्वे पोलीस याची मदत घेवुन गुन्हयातील अपनयन बालक मुकद्दस तजमुल शेख वय २ वर्ष २ महीने व संशयित इसम मालिकराम सत्तन यादव वय ३३ वर्षे यास ताब्यात घेतले.

आरोपी मालिकराम सत्तन यादव यास ताब्यात घेवुन पोलीस ठाण्यास करण्यात आलेल्या तपासात त्यास मुलबाळ होत नसल्याने त्यास मुल दत्तक घ्यावयाचे होते परतु त्यास मुल दत्तक मिळत नसल्याने, हव्यासा पोटी त्यानी गुन्हयातील बळीत बालकाचे अपहरण केले असल्याचे सागितले. गुन्हयातील अपनयन बालकाची वैदयकिय तपासणी करण्यात आली असता, जखमा वा लैगिक अत्याचार झाल्याचे वैदयकिय तपासणीत दिसुन आले नाही. गुन्हयाचे घटनास्थळी प्राप्त सी. सी.टि.व्ही फुटेज प्रमाणे आरोपी मालिकराम सत्तन यादव यांनी बळीत यांचे अपहरण करण्यापुर्वी सदर परिसराची रेकी व पाहणी करुन टेहाळणी केली होती. त्यानंतर बळीत बालकाचे अपहरण केले असल्याचे स्पष्टपणे दिसुन येते. तसेच आरोपीताने उददेशपुर्वक सदर बालकाचे अपहरण करण्याचे उददेशाने त्यास लखनऊ, राज्य उत्तरप्रदेश या ठिकाणी घेवुन गेला होता.

शिवाजीनगर पोलीस ठाणे, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस निरीक्षक | जब्बार बादशाह तांबोळी | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | सहा. पोलीस निरीक्षक | नवनाथ शिवाजी काळे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहा. पोलीस निरीक्षक | किरण विठठ्ल वराळ | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक | प्रशांत मनोहर हातीम | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक | माणिक मारूती जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोलीस उप निरीक्षक | दत्तात्रय विलास मालवेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पोलीस उप निरीक्षक | यशवंत विठोबा कळवणकर | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | महिला पोलीस उप निरीक्षक | जयश्री बाळासो साळूंखे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | महिला पोलीस उप निरीक्षक | रेखा दत्तात्रय दिघे | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :—**

दिनांक २०/०६/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या " **BEST CONVICTION OF THE MONTH** " माहे मार्च —२०२३ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ मार्च— २०२३

| | | |
|---|---|---|
| **०४** | **शिवाजीनगर पोलीस ठाणे, परिमंडळ—०६, मुंबई** | **गु.र.क्र. ३४७/२०२० कलम ३७६, ३७६ (२) (एफ) (एन), ३७६ (एबी), ३७६(सी), ३५४, ३५४(ए) भादंवि सह कलम ४, ६, ८, १० पोस्को ॲक्ट** |

**—: " अल्पवयीन मुलीवर लैगीक अत्याचार ":—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात फिर्यादी श्रीमती इशरत जहा लालमोहम्मद शेख, वय ३३ वर्षे, यांची वय ११ वर्षे ७ महिने ची अल्पवयीन मुलगी ही अल्पवयीन असल्याचे माहित असुन सुध्दा आरोपी लालमोहम्मद नुरमोहम्मद शेख, वय ४० वर्षे, याने तिच्या छातीवर व गुप्तांगावर हात फिरवुन तिला धमकावुन तिचेशी जबरदस्तीने वारंवार शारीरीक संबंध करून लैगिक अल्याचार केले म्हणून गुन्हा नोंद

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती इशरत जहा लालमोहम्मद शेख, वय ३३ वर्षे, |
| बळीत | :— | वय ११ वर्षे ७ महिने ची अल्पवयीन मुलगी |
| निकाल दिनांक | :— | दि. २९/०३/२०२३ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | लालमोहम्मद नुरमोहम्मद शेख, वय ४० वर्षे,<br>अटक दि ०७/०७/२०२० रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | मा.न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवुन त्यास २० वर्षे कारावास व १० हजार दंड व दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावलेली आहे. |

**तपास कौशल्य** :— नमूद गुन्हयातील तपासी अधिकारी पो.नि.होवाळे यानी सदर गुंन्हयाचा अंत्यत कौशल्यपुर्ण तपास करून आरोपी विरूध्द असलेले संपूर्ण शास्त्रोक्त व परिस्थिती जन्य पुरावे गोळा केले. तसेच सर्व पुराव्याची योग्य पध्दतीने दोषारोपपत्रा मध्ये मांडणी केली.

तसेच न्यायालयीन कामकाज करणारे पैरवी अधिकारी व कर्मचारी यांनी आरोपी विरूध्द दाखल केलेल्या दोषारोप पत्रामधील सर्व साक्षीदार व पंच यांना विहीत वेळेत मा. न्यायालयासमक्ष हजर ठेवले होते. व आरोपी यांस न्यायालयीन शिक्षेपर्यंत पोहचविण्याची उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे. त्सामुळे नमुद गुन्हयात दोषसिध्दी प्राप्त केली आहे.

**शिवाजीनगर पोलीस ठाणे, मुंबई. न्यायालयीन कामकाज पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस उप निरीक्षक | दिपक भरत कडभाने | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पो.ह.क्र ३२१५७ | राजेश सखाराम दहीबावकर | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पो.ह.क ९८००४२१ | शिवाजी वसंत वायदंडे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.शि.क्र १३००३९ | प्रविण सदाशिव सांळूखे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोशिक्र ०९०४०६ | चंद्रकांत रावसाहेब बडे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.शि.क्र ०९२९९५ | सुधीर जग्गनाथ क्षिरसागर | प्रशस्तीपत्रक |

**टिप:—** वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोलीस ठाणे यांना कळविण्यात येते की, Best Detection of the Month March – 2023 व Best Conviction of the March – 2023 **या करीता निवड झालेनंतर राज्य स्तरावर प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र 'क' प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.**

## Best Detection of the Month

## 'प्रपत्र 'क'

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | **Property offence** बाबतीत **a)** गेलेला माल **b)** जप्त/हस्तगत केलेला माल | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे,<br>**a)** घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | **Inquest** पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | **DNA** टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | **CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence** बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | **Cyber Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | **FORENSIC Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | **Dog Squad** ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | **Fingerprint / Handwriting Expert** ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी **Portrait** बाबत **Expert** ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) **FIR** प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब,शवविच्छेदन अहवाल, आळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणा साठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा.सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## ‘प्रपत्र ‘ क ’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०५ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०६ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| १० | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| ११ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>**A)** साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>**B)**पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>**C)** परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>**D)** तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>**E)** वैज्ञानिक /तांत्रिक पुरावे<br>**F)** तपासी अंमलदार यांचे जबाब<br>**G)** पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>**H)** सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १२ | तपास व अपराधसिध्दी करीता यांगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) मा.न्यायालयाचे निकालपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आललो आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव निकाल लागलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे

# <u>INTEGRITY CERTIFICATE</u>

Certified that the integrity of Mr/Mrs …………………………………, Designation-…………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2022 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated/pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2023